पुढारी

# सिनेट पदवीधर नोंदणीसाठी विक्रमी ४८ हजार ५७० अर्ज

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने सिनेट पदवीधरसाठी अखेरच्या दिवसापर्यंत (११ जुलै) विक्रमी सुमारे ४८ हजार ५७० जणांनी नोंदणी केली.

विद्यापीठ अधिसभेच्या प्राचार्य, व्यवस्थापन प्रतिनिधी, नोंदणीकृत पदवीधर आणि शिक्षक तसेच विद्यापरिषदेत निवडून द्यायचे आठ शिक्षक व अभ्यास मंडळासाठी निवडून द्यायचे विभागप्रमुख यासाठी मतदार यादी तयार करणे व नोंदणीकृत पदवीधर मतदार नोंदणी २०२२ मधील नोंदणी प्रक्रिया राबवली जात आहे. अधिकाधिक मतदारांना नावनोंदणी करता यावी, यासाठी विद्यापीठाने ११ जुलैपर्यंत मुदतवाढ दिली होती. शेवटच्या दिवशी सुमारे सायंकाळी सात वाजेपर्यंत ४८ हजारांहून अधिक जणांनी नोंदणी केली आहे. रात्री बारा वाजेपर्यंत ऑनलाईन नोंदणीची मुदत आहे. ऑनलाईन भरलेली माहिती आवश्यक कागदपत्रांसह विद्यापीठ कार्यालयाकडे १५ जुलैपर्यंत सायंकाळी ६ पर्यंत पाठविण्याचे आवाहन केले आहे.

पुण्यनगरी

# मास कम्युनिकेशनच्या विद्यार्थ्यांचा अभ्यास दौरा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या मास कम्युनिकेशनच्या विद्यार्थ्यांचा अभ्यास दौरा इंदूर, मध्य प्रदेश येथे आयोजित करण्यात आला होता. यावेळी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जन्मगाव महू मध्य प्रदेश येथील स्मारकास भेट दिली. अभ्यास सहलीमध्ये मास कम्युनिकेशनचे २७ विद्यार्थी सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांसह समन्वयक डॉ. निशा पवार, डॉ. सुमेधा साळुंखे सहभागी झाले. यावेळी कर्मवीर विद्यापीठ, खांडवाच्या पत्रकारिता विभागाचे डॉ. संदीप भट्ट, डॉ. अरुण कंगुरी, स्मारकाच्या कार्यकर्त्या दीपाली वाघमारे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
12 JUL 2022 पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# लाखो विद्यार्थी घडविणारे सुवर्णमहोत्सवी

## श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय



राजर्षी शाहू महाराजांच्या व बोंद्रेदादांच्या विचारांचा वसा आणि वारसा घेऊन हे महाविद्यालय बहुजन समाजातील मुला-मुलींना गुणवत्तापूर्ण व कौशल्याधारित शिक्षण देत आहे. गुणवंत विद्यार्थ्यांसाठी 'शहाजी ऊर्जा' पारितोषिक ही अभिनव योजना महाविद्यालयाने सुरू केली असून, त्यामध्ये ६ लाख ७१ हजार रुपयांची कायमस्वरूपी ठेव रक्कम माजी विद्यार्थी, प्राध्यापक, माजी प्राध्यापक व हितचिंतक यांनी महाविद्यालयाकडे सुपूर्द केली आहे. या रकमेच्या व्याजातून १०० हून अधिक पारितोषिके गुणवंत विद्यार्थ्यांना दिली जातात. **-डॉ. आर. के. शानेदिवाण, प्राचार्य**

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

राजर्षी शाहू छत्रपती महाराज व कै. श्रीपतराव बोंद्रे यांचा विचार व वारसा घेऊन बहुजन समाजातील मुला-मुलींना गुणवत्तापूर्ण शिक्षण देणारे कोल्हापूर शहरातील महाविद्यालय म्हणजे श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्थेचे, श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय होय. दरवर्षी चार हजारांहून अधिक गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून देत आहे. आजवर लाखो विद्यार्थ्यांना या महाविद्यालयाने घडविले असून, ते विद्यार्थी आता उच्चपदावर पोहोचले आहेत.

महाविद्यालयाने सुवर्णमहोत्सवी वर्ष साजरे केले आहे. गेल्या पन्नास वर्षात एक लाखाहून अधिक विद्यार्थ्यांना ज्ञानदानाचे कार्य केले. महाविद्यालयात कला, वाणिज्य व विज्ञान या विद्याशाखा असून यामध्ये बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी., बी. सी.ए. हे पदवी अभ्यासक्रम व एम. कॉम. हा पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू आहे. तसेच शिवाजी विद्यापीठाच्या आजीवन शिक्षण आणि विस्तार विभागाचे विविध १६ प्रमाणपत्र अभ्यासक्रम कोर्सेस सुरू आहेत. महाविद्यालयात शिवाजी विद्यापीठाचे पदवी आणि पदव्युत्तर दूरशिक्षण केंद्र कार्यरत आहे. तसेच यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक यांचे एमबीए अभ्यासक्रम केंद्र कार्यरत आहे. महाविद्यालयात कला शाखेसाठी आयसीटी साधनांनीयुक्त विषयवार विभाग कार्यरत आहेत.

वाणिज्य विभागाची व्यावसायिक शिक्षण देणारा विभाग म्हणून विशेष उल्लेख होतो, तर विज्ञान विभागात विविध अद्ययावत प्रयोगशाळा व बीसीए विभागाचा अद्ययावत संगणक कक्ष कार्यरत आहे. परिपूर्ण ग्रंथसंपदेने व आयसीटी साधनांनीयुक्त शिवाजी ग्रंथालय कार्यरत आहे.

स्पर्धा परीक्षा तयारीसाठी कै. श्रीपतराव बोंद्रेदादा स्पर्धा परीक्षा केंद्र कार्यरत आहे. महाविद्यालयास उज्ज्वल क्रीडा परंपरा लाभलेली आहे. महाविद्यालयाने सलग तीन वर्षे शिवाजी विद्यापीठाची मानाची मेघनाथ नागेशकर ट्रॉफी पटकावलेली आहे. महाविद्यालयाचे अनेक खेळाडू राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर विविध क्रीडा प्रकारांत चमकलेले आहेत.

12 JUL 2022
तरूण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पदवीधर मतदारांमध्ये तिपटीने वाढ


## ४८५२९ जणांची ऑनलाईन नावनोंदणी : शिवाजी विद्यापीठाच्या इतिहासात प्रथमच विक्रमी नोंदणी

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाने पदवीधर मतदार नावनोंदणीसाठी दोनवेळा मुदतवाढ दिली होती. त्यामुळे ऑनलाईन नोंदणीच्या शेवटच्या दिवशी सोमवारी सायंकाळी ७ वाजेपर्यंत ४८५२९ मतदारांनी नावनोंदणी केली. गेल्या पंचवार्षिक विद्यापीठ निवडणुकीसाठी १७ हजार मतदार पात्र ठरले होते. त्यामुळे यंदा पदवीधर मतदार नोंदणीमध्ये तीनपटीने वाढ झाली आहे. १५ जुलैपर्यंत विद्यापीठातील निवडणूक विभागात अर्ज जमा करावयाचे आहेत.



शिवाजी विद्यापीठातील विविध अधिकार मंडळासाठी सप्टेंबर–ऑक्टोबरमध्ये निवडणुका होणार आहेत. त्यासाठी पदवीधर मतदार ऑनलाईन नोंदणी प्रक्रिया सोमवारी मध्यरात्री १२ वाजता पूर्ण झाली. यंदा विद्यार्थी संघटना, शिक्षक संघटना आणि संस्था चालकांनी पदवीधर नावनोंदणी प्रक्रिया युध्दपातळीवर राबवली. त्यामुळे आतापर्यंतच्या विद्यापीठाच्या इतिहासात जेवढी पदवीधर मतदारनोंदणी झालेली नव्हती, त्यापेक्षा जास्त तीनपटीने ऑनलाईन मतदार नावनोंदणी झाली आहे. त्यामुळे विद्यार्थी संघटना, शिक्षण संस्था, प्राध्यापक यांच्याकडून समाधान व्यक्त होत आहे. ११ जुलै रोजी रात्री १२ वाजेपर्यंत जेवढे ऑनलाईन अर्ज प्राप्त झाले त्या अर्जांची छाननी केली जात आहे. छाननीनंतर कच्ची मतदारयादी तर हरकती आणि दुरूस्तीनंतर पक्की मतदार यादी जाहीर केली जाईल. विद्यार्थ्यांनी नेट कॅफे, लॅपटॉप आणि मोबाईलवरून पदवीधर ऑनलाईन मतदार नोंदणी केली आहे.





### छाननीनंतरच अंतिम मतदार संख्या जाहीर

शिवाजी विद्यापीठ निवडणुकीसाठी पदवीधर मतदारनोंदणी संपलेली आहे. एकूण मतदार नोंदणीच्या अर्जांची छाननी केल्यानंतर निवडणुकीसाठी किती पात्र मतदार ठरतील यावर निवडणुकीची केंद्र निश्चिती होणार आहे. तरीही सध्या शहाजी कॉलेज, कॉमर्स कॉलेज, सायबर कॉलेज ही तीन मतदान केंद्रे निश्चित केली आहेत. मतदारांची संख्या वाढल्यास केंद्रात वाढ होणार आहे.

12 JUL 2022 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दूधसाखर महाविद्यालयाची गुणवत्ता अधोरेखित

## के. पी. पाटील : 'विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती' योजनेत ग्रामीण गटांतर्गत प्रथम

प्रतिनिधी
सरवडे

दूधसाखर महाविद्यालय हे गुणवतेमध्ये अग्रेसर असून शिवाजी विद्यापीठाकडून त्यांना सलग चौथ्या वर्षी प्रमाणपत्र प्राप्त झाल्याने एक प्रकारे त्यावर शिक्कामोर्तब झाला असून गुणवत्ता अधोरेखित झाली आहे, असे प्रतिपादन दूधसाखर शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष के. पी. पाटील यांनी केले. महाविद्यालयाला गुणवत्ता प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतरच्या सत्कार कार्यक्रमात अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते.

प्राचार्य डॉ. संजय पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. महाविद्यालयामार्फत विद्यार्थ्यांना केंद्र व राज्य शासनाच्या आणि विद्यापीठाकडून मिळणाऱ्या विविध शिष्यवृत्तीसाठी प्राधान्याने प्रयत्न केले जातात. शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी पुढीलप्रमाणे- बी. एस्सी. भाग एक मधील अनिकेत पाटील, अंकिता साळोखे, अश्विनी पाटील, साक्षी पाटील, वैजयंती सुतार, वैभव लोखंडे, ओंकार रेडेकर, बी. एस्सी. भाग तीनमधील भक्ती सोनार, सृष्टी कल्याणकर, बी. ए. भाग एक मधील नीलम पाटील, सानिका बारड, अमृता अस्वले, अक्षय पाटील या विद्यार्थ्यांनी गुणवत्ता शिष्यवृती प्राप्त केली आहे.



बिद्री : गुणवत्ता शिष्यवृत्ती योजनेत दूधसाखर महाविद्यालय प्रथम आल्याबद्दल प्राचार्य डॉ. संजय पाटील यांचे अभिनंदन करताना अध्यक्ष के. पी. पाटील व इतर.

याकामी डॉ. एस. के. सावंत, डॉ. एस. आर. पाटील, डॉ. एस. ए. साळोखे, डॉ. एस. एच. पाटील, अधीक्षक एस. के. पाटील, व्ही. डी. तळेकर, आर. एम. देसाई, रणजित पाटील, सागर पाटील, संजय गुरव तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे मोठे योगदान आहे.

यावेळी उपाध्यक्ष विठ्ठलराव खोराटे, सचिव एस. जी. किल्लेदार, सर्व संचालक मंडळ, कार्यकारी संचालक के. एस. चौगले, व्यवस्थापकीय संचालक आर. डी. देसाई, इतर अधिकारी वर्ग, सर्व प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी उपस्थित होते.